# प्रथा - काही उपआख्याने

**- चन्द्रशेखर पुरन्दरे**

[प्रत्येक 'तो' वेगळा आहे.]

- वैद्यकीयदृष्ट्या तो मंदबुद्धी नसावा पण आकलनशक्ती आणि स्मरणशक्तीही एकूण कमी. उदाहरणार्थ, शाळेत त्याला दहाच्या पुढचे पाढे शिकता येत नसत, शालेय शिक्षणातही लक्ष नव्हते. या गोष्टीची आईला काळजी वाटत असे. तिला त्याच्या बौद्धिक क्षमतेविषयीही शंका होती. जेव्हाकेव्हा अभ्यासात जरा हुशार असलेला पुतण्या त्यांच्याकडे येई, तेव्हा ती त्याला या मुलाचा अभ्यास घ्यायला सांगे. असाच एकदा हा पुतण्या मुलाला जीवशास्त्रातील शरीराची चयापचय क्रिया समजावून सांगत होता. तेव्हा मुलाने 'ए, 'च'च्या भाषेत काय बोलतो?' असा आक्षेप घेतला होता. त्याचे बोलणेही तोंडातल्या तोंडात असे. खेळ विचित्र असत. शाईमध्ये टूथ पेस्ट मिसळून ते मिश्रण फ्रीजला फासणे, चिक्की खोडरबराला लावणे, ती चिक्की आणि वडिलांची तंबाखू थोरल्या बहिणींच्या पर्समध्ये टाकणे इत्यादी. दोन मुलींनंतरचा मुलगा. त्यामुळे प्रथेनुसार तो आई-वडिलांचा लाडका होता. एक बहीण तिळपापड कसा करावा याची कृती सांगत असे. ''एक हा घ्या' म्हणजे तुमचा तिळपापड लगेच होईल' अशी ग्वाही देत असे. वाचनाशी अर्थातच त्याचा संबंध नव्हता. अक्षरओळख होती एवढेच. अगदी स्थानिक पु. ल., व. पु., रमेश मंत्री इत्यादी लेखक [!] माहीतही नव्हते मग कालिदास, नाबोकोव, शेक्सपियर दूरच.

धड मार्क न मिळाल्याने शाळेनंतर त्याला कोणत्याच चांगल्या कॉलेजात प्रवेश मिळेना. मग भक्कम देणगी देऊन कोणत्यातरी खाजगी कॉलेजात नाममात्र डिप्लोमाच्या कोर्ससाठी वडिलांनी नाव नोंदवले. त्यातही नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे हे कुटुंबीय कट्टर हिंदुत्ववादी व प्रखर मुस्लीमविरोधी होते व आहेत. कॉलेजची मालकी व मॅनेजमेंट मुस्लीम होती! तो कोर्स त्याने पूर्ण केला नाही.

मग आई-वडिलांनी त्याला दुसऱ्या गावी त्याच्या मामाकडे काही काळ ठेवले. मामा दोनचाकी गाड्या दुरुस्त करत असे. नंतर तो चारचाकी गाड्यांची खरेदी-विक्री करू लागला. मामा या मुलाचा आदर्श होता कारण तोही फारसा शिकलेला नव्हता व उंच होता. तो सतत सिगरेटी फुंकट असे. याने वडिलांप्रमाणे तंबाखू लावणे सुरू केले. मामाबरोबर हाही गॅरेजमध्ये काम करू लागला. मग मामानेच त्याला जवळच्या एका मोठ्या ट्रक बनवणाऱ्या कंपनीत नोकरीला लावले. तेथे पगार चांगला होता आणि नोकरीची हमी होती. तेथे एकदा माणूस चिकटला की तो निवृत्त होऊनच बाहेर पडत असे. पण याला त्याच कंपनीला पार्ट्स पुरवण्याचे वर्कशॉप काढण्याचे स्वप्न पडू लागले. एका प्रथेनुसार विचारसरणी अशी - 'आपल्यासाठी नोकरी नाही, आपण धंदा करणार'. मामाच्या ओळखीचा एक माणूस या कंपनीला काही पार्ट्स पुरवत असे. त्याला लागणारे काही पार्ट्स बनवण्याचे वर्कशॉप काढायचे अशी योजना. त्या माणसाने यात इंटरेस्ट असणारा एक माणूस गाठून दिला. पैसे यांचे, म्हणजे निम्मे याच्या वडिलांचे आणि निम्मे त्या माणसाचे. पण याला स्वतःला काहीच तांत्रिक किंवा व्यावसायिक ज्ञान किंवा धूर्तपणा नसल्याने भागीदाराने त्याच्या

पूर्वनियोजित प्लॅनप्रमाणे याला अल्पावधीत हाकलून दिला. वडिलांचे बरेच पैसे बुडले. म्हणजे याने चांगली नोकरी घालवली आणि धंद्याच्या नादात पैसेही.

मग याने इस्टेट ब्रोकर/एजंट होण्याचा प्रयत्न केला. नवीन प्रथेप्रमाणे अल्पशिक्षित व कोणतेच कौशल्य नसणारी मध्यमवर्गीय तरुण मंडळी हा प्रयत्न करतात. याने एकदोन असे व्यवहार केलेही. थोडाफार पैसा सुटला. पुढे काही नाही. दरम्यान प्रथेनुसार त्याचे लग्नाचे वय झाले. आई-वडिलांनी एक मुलगी शोधली आणि लग्नानंतर हा स्थिरावेल अशी प्रथेनुसार अपेक्षा ठेवली. तसे थोडेफार झालेही. हा एका  ठिकाणी नोकरीला लागला. त्यांना यथावकाश दोन मुलीही  झाल्या. त्याची कंपनी मोठ्या कंपन्यांची साफसफाईपासून मशिनरी हलवण्यापर्यंत कामे करत असे. बंगालमधून टाटांचा मोटारी बनवण्याचा कारखाना राजकीय कारणांनी हलवायला लागला. तो गुजरातमध्ये गेला. तेव्हा हे प्रचंड काम या कंपनीने इतर काही कंपन्यांबरोबर घेतले. हा त्यासाठी तेथे जाऊन राहिला. नंतर अशाच कामासाठी बिहारमध्ये होता. महिनोन् महिने हा बायको-मुलींपासून दूर असे. बायकोला विरह सहन होईना. [त्यातही एक शक्यता अशी की ती नवऱ्याकडे मातृत्वाच्या दृष्टीनेही पाहात असे, अशी मानसिक अवस्था विरळा असली तरी असू शकते. विशेषतः नवरा बुद्धीने कमकुवत असला तर].  प्रथेनुसार तिने मुलींना आजी-आजोबांकडे ठेवले व ती त्याच्याकडे रवाना झाली.

कंपनीचे बाहेरगावीचे  काम संपल्यावर दोघे परत त्याच्या आई-वडिलांकडे आले. दरम्यान कंपनीने नवीन उद्योग सुरू करायचा विचार केला. भारतातून भाजीपाला मध्य-पूर्वेला निर्यात करणे. याला भारतीय भाजीपाल्याच्या मार्केटचा अभ्यास करायला सांगितला. हा ग्रामीण महाराष्ट्रात फिरला, शेतकऱ्यांना त्याने घरीही बोलावले व मीटिंग्ज घेतल्या. विशिष्ट पिकांचे भौगोलिक क्षेत्र, मौसम, भाव वगैरे माहिती गोळा केली. ती वरिष्ठ साहेबाला  सादर केली. त्याबरोबरच 'या डिपार्टमेंटचा मला प्रमुख करा' असेही सांगितले. पण कंपनीने त्यांच्याकडून या व्यापाराची माहिती काढल्यावर हा धंदा करणे धोक्याचे आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तो प्लॅन रद्द केला. दरम्यान याचा पगार चालू आणि काम नाही असे एक-दोन महिने गेल्यावर कंपनीने त्याला काढून टाकले. म्हणजे, जेमतेम दोन महिन्यात विभागप्रमुख या स्वप्नाचा चुराडाच झाला नाही तर नोकरीही गेली. मग बायको लोणची, फराळाचे पदार्थ करून विकू लागली. प्रथेनुसार तो धंदा चांगला चालला. दिवाळी वगैरे सणांसाठी ती मदत म्हणून चार बायकाही नेमत असे.

दरम्यान याची वृद्ध आत्या मरण पावली. तिचा मुलगा इंग्लंडला असे. तिची काळजी घेण्यासाठी याची आई व दोन कामाच्या बायका २४ तास घरी होत्या. दुर्घटनेनंतर लगेचच याच्या आईने याला बोलावून घेतले. आत्याच्या कपाटात नेहमी काही हजारांत रोख पैसे असत. ते तेव्हाही होते. ते याच्या उपस्थितीत गायब झाले. घरच्यांनी प्रथेनुसार कामवाल्या बायकांवर संशय घेतला. कामवाल्या बायकांच्या मते याने ते उचलले. त्यांनी त्यांचा संशय आत्याच्या एका नातलगाला सांगितला. त्याच्याकडून तो मुलाला कळला. मुलगा पुढे पुण्याला आल्यावर त्याने त्याच्या दोन मामेभावांना आणि याला संध्याकाळी जेवायला बोलावले. याला दारू जास्त झाली. त्या नशेत त्याने शर्ट, पॅन्ट फेडले आणि आतल्या कपड्यांवर तो नाचू लागला. त्याचा मळका गंजीफ्रॉक फाटलेला होता व त्यात काही भोकेही होती. 'पार्टीत मजा आली नाही' असेही त्याने नमूद केले.

आतेभावाने पैशांचा प्रसंग सांगितला व आळ त्याच्यावर आहे हेही सांगितले. दारू जरा उतरली.

हा आरोप कळताच याची आई आणि बायको तातडीने आत्याच्या मुलाला भेटायला आल्या. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे. माझ्या मुलगा, माझा नवरा असे काही करणेच शक्य नाही असा गजर लावला. आतेभाऊ वारंवार 'मी इथे नव्हतोच, मी कामवाल्या बायकांचा संशय हसण्यावारी नेला ' असे सांगत होता. ते त्या ऐकेनात. [त्यामागे वर म्हटल्याप्रमाणे त्याच्याबाबत बायकोचा संदिग्ध दृष्टिकोनही असावा.] 'त्याने कोट्यवधींचे व्यवहार केले आहेत, हे तर काही हजार ' इत्यादी. जणू काही ते व्यवहार त्याने वैयक्तिकरीत्या जबाबदार भूमिकेतून केले होते!

आतेभावाची दीड-दोन तास करमणूक करून स्त्रिया रवाना झाल्या. अशी मजा!

- चार मुलींनंतर अखेरीस त्याचा जन्म झाल्यावर त्याच्या आई-वडिलांनी सुस्कारा टाकला. आपण प्रथेनुसार वागत आहोत याचा मोठा आश्वासक विश्वास त्यांना प्राप्त झाला. मुली दिसायला बऱ्या आणि गोऱ्या होत्या. त्यांची लग्ने प्रथेनुसार यथावकाश झाली. थोरल्या दोघी आई-वडिलांच्या निवडीने व सुस्थळी पडल्या. तिसरीचे प्रेम एका दूरच्या नात्यातल्या मुलावर होते पण तो त्याबाबत उदासीन होता. मग तिने ऑफिसातील एकाला पत्करला. ती मराठी, तो बंगाली आणि कोलकात्याचा. लग्नानंतर ती तिकडे रवाना झाली.

वडील बांधकाम क्षेत्रात होते. अतिशय प्रामाणिक व मितभाषी. त्यांनी पुण्यातल्या श्रीमंत भागात आलिशान बंगला बांधला. त्याला तळघरही होते. ते प्रेमळ असल्याने त्यांनी घराचा बराचसा भाग नात्यातल्या लोकांना बिनभाड्याने राहायला दिला. ही मंडळी वर्षानुवर्षे तेथे तळ ठोकून राहिली. एक खोली त्यांनी एका इंजिनीअरला भाड्याने दिली. त्याने चौथ्या मुलीला गर्भार ठेवले. मग त्यांचे लग्न लावून देण्यात आले. हा इंजिनीअर नंतर स्थानिक इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये शिकवायला लागला.

प्रथेनुसार मुलगा किमान पदवीपर्यंत शिकेल अशी आईवडिलांची अपेक्षा होती. तसे [तेही पर्यायी प्रथेनुसार] झाले नाही. तो इंजिनीयरिंगचा डिप्लोमाही पुरा करू शकला नाही. तीन वर्षांच्या कोर्समध्ये दोनदा नापास झाल्यावर आई-वडिलांनी हा शिकणार नाही हे ओळखले. दरम्यान त्याने दारूची चव घेतली होती आणि काही जणांच्या प्रथेप्रमाणे त्याला ती आवडली.

त्याने बंगल्यातच गॅरेजमध्ये छोटे वर्कशॉप सुरू केले. तो तांब्याची तार ट्रान्सफॉर्मवर गुंडाळत असे. इतरही बरेच छोटे उद्योग करत असे.

त्यात बनवाबनवी करायला तो मागेपुढे बघत नसे. नात्यातला एक जण एका कंपनीत मॅनेजर होता. त्याने याला कंपनीच्या इमारतीबाहेर एक चौथरा बांधण्याचे छोटे काम दिले. त्यावर काही मशीनरी बसणार होती. मशीनरी आली आणि चौथऱ्यावर ठेवताच चौथरा ढासळायला लागला. कारण याने एका अडाण्याला हे काम दिले होते. त्याने साध्या, प्राथमिक स्थापत्य गोष्टी पाळल्या नव्हत्या. मग याची नाही पण कंपनीतल्या लोकांची धावपळ झाली. मशिनरी एक क्रेन बोलावून उतरवण्यात आली. या अनावश्यक खर्चाची भरपाई त्याच्याकडून घेण्यासाठी मॅनेजरने चेक मागितला. याने चेक त्वरित दिला आणि तो चेक बाऊन्स झाला! असे याचे अज्ञानमूलक व अप्रामाणिक काम.

त्यामुळे त्याला पैसा काही फार मिळत नसे पण त्याचा उद्देश म्हणजे संध्याकाळची रमची क्वार्टर सुटावी. ते जमत असे. प्रथेनुसार त्याला इतरही महागड्या दारू आवडत पण परवडणारी फक्त रम होती. तीही तो दारूच्या दुकानातून आणत नसे. स्वस्त व नियमित पुरवठा व्हावा म्हणून त्याने एक इसम शोधला. तो लष्कराच्या कॅन्टीनमध्ये नोकरीला होता. जागतिक प्रथेनुसार सरकार लष्कराचे लाड करत असे. त्यात शिधा, दूध, दारू स्वस्तात असे. हा इसम तेथून चोरी करून किंवा त्याच्या अधिकृत पुरवठ्यातून काही बाटल्या महिन्याकाठी उचलत असे. त्यामुळे त्याच्याकडे नेहमीच स्टॉक असे. याला एका वेळी जेमतेम एकच क्वार्टर परवडत असे. त्याचा एकूण दृष्टिकोनही निराळा होता. पक्षी साठा करतो का असे तो स्वतःला विचारत असे. जे दारूबाबत तेच धंद्याबाबत. मुळात आई-वडिलांनंतर त्यांचे बँकेतले पैसे आणि हा प्रचंड मौल्यवान बंगला आपलाच आहे याचे त्याला पूर्ण भान होते. साठा त्यांनी केला आहेच मग आपण कशाला श्रम घ्यायचे. या विचारामुळेही असेल पण तो अल्पसंतुष्ट म्हणावा असा होता.

तळघर रिकामे होते. तेथे तो बाहेरगावचे विद्यार्थी काही महिन्यांसाठी कॉटबेसिसवर ठेवत असे. ही मोठी व निश्चित मासिक आवक होती. मद्यपानामुळे त्यातील काही त्याचे मित्रही झाले. कधीमधी वडील अचानक तेथे आले तर प्रथेनुसार मंडळींची जरा पंचाईत होत असे. चौथ्या मेव्हण्याची आणि त्याची दोस्तीही इथेच सुरू झाली पण त्याचे लग्न बहिणीशी झाल्यावर काहीतरी बिनसले.

वडील जसे म्हातारे होऊ लागले तसा त्यांचा घरातील

दबाव कमी होऊ लागला, मग याने फुकट राहाणाऱ्या दोन-तीन नातेवाईकांना बाहेर काढले. त्याबाबत तो निष्ठुर वागला. रिकामी झालेली एक खोली त्याने एका भाच्याला बिनभाड्याने दिली व प्रथा मात्र चालू ठेवली. भाचा नोकरीला होता, दुसऱ्या गावाहून आलेला होता. त्याला सुरुवातीला हे सोयीचे गेले. पण त्याला प्रायव्हसीही महत्त्वाची होती. याच्यासाठी मात्र ही खोली म्हणजे रोज संध्याकाळी इष्टअनिष्ट मित्रमंडळींबरोबर दारू पिण्यासाठीचा हक्काचा अड्डा होता. असा दृष्टिकोनातील फरक. अखेर भाच्याने प्रथेप्रमाणे आपल्या वडिलांकडून पैसे घेऊन दुसरी जागा घेतली. या भाच्याला एक थोरला भाऊ होता. त्याच्या शब्दांत 'भाचे वाढले, मामा वाढला नाही!' या थोरल्या भाच्याचे वाचन चांगले होते, तो रसिकही होता. त्याला जागतिक अभिजात वाङ्मय थोडेफार माहीत होते. संगीत आणि चित्रकलेतही रस होता. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय राजकीय आणि सांस्कृतिक प्रवाहांबाबत तो जागरूक असे. त्या अर्थी मामाची वाढ खुंटलेली होती. मामाला मणिपूरमध्ये, छत्तीसगढमध्ये अशांतता असते इतपतही माहिती नसायची. किंबहुना हे प्रदेश नाकाशावरही त्याला दाखवता आले नसते.

यथावकाश त्याला लग्नाची जरूरी वाटू लागली. त्यात दोन अडचणी होत्या. एक म्हणजे तो जेमतेम पाच फूट उंच होता, म्हणजे बुटक्यातच जमा. दुसरे मद्यपान. आई-वडील प्रतिष्ठित असले तरी त्यांच्या परिवारात व माहितीच्या लोकांत याची ओळख दारुड्या अशी होती. प्रथेप्रमाणे तो प्रॉब्लेम होता कारण लोक व्यक्तीचे सुलभीकरण करतात. त्यांना एकरेषीय खुलासे आवडतात. एखादा चांगला नर्तक असला आणि मद्यपी असला तर प्रथम मद्यपी ही ओळख होते, नंतर झाली तर नाराजीने नर्तक. त्यात याच्यात बाकी सांगण्यासारखे काहीच गुण नव्हते. त्यामुळे, बंगला ठीक आहे पण मुलगी दारुड्याला द्यायला कोणी तयार होईना. जुळवून लग्न होईना. तिशी जवळ येऊ लागली तेव्हा त्याने एका वधू-वर सूचक संस्थेत नाव नोंदवले. ज्यांचे लग्न जुळणे कठीण झालेले असे, असे तरुण लोक या संस्थेत जात. तेथे इच्छुक एकमेकांना भेटत व जमल्यास लग्न ठरवत. तो प्रथेनुसार घर चालेल एवढा पैसा मिळवत असे. बंगला होताच, कौटुंबिक जबाबदारी नव्हती. त्यामुळे तेथे त्याचे लग्न जमले.

मुलगी त्याच्यापेक्षा उंच होती. गरीब घरातील होती. तिला दोन धाकट्या बहिणी होत्या. त्यांच्या लग्नाचे दडपण तिच्यावर दिवासागणिक वाढत होते. एकूण हे स्थळ म्हणून तिला ठीक वाटले. प्रथेनुसार तिचा प्रथम रोजच्या मद्यपानाला आक्षेप होता. प्रथेनुसार तिने माझ्यावरील प्रेम किंवा दारू असाही पवित्रा घेऊन बघितला. विटगेन्स्टाइन नावाच्या तत्त्वज्ञाने अशा पवित्र्यातील त्रुटी दाखवली आहे. दोन भिन्न संदर्भचौकटीतील गोष्टींची तुलना करता येत नाही. तिला हे माहीत नसावे पण त्याने या शब्दांत हा सिद्धांत माहीत नसूनही त्या आक्षेपाला दाद दिली नाही. मग एक मूल झाल्यावर हा कुटुंब नीट चालवतो हे पाहून ती मद्यपानाकडे दुर्लक्ष करू लागली. यथावकाश प्रथेनुसार त्यांना दुसरी अपत्यप्राप्तीही झाली.

आई-वडील गेल्यावर प्रथेनुसार यथावकाश त्याने बहिणींची नावे कमी करून बंगला आपल्या नावावर करून घेतला. बहिणींनीही प्रथेनुसार नवऱ्यांचे सल्ले घेऊन हक्क सोडला. प्रथेनुसार बंगला पाडून तेथे ओनरशिप इमारतही करून घेतली. दोन्ही मुले परदेशी चांगल्या नोकऱ्यांवर होती.

असा त्यांचा संसार हा सुखाचा, ते अमृतात नहाले.

**– चन्द्रशेखर पुरन्दरे**
purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk